# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

| | |
|---|---|
| दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० <br> फॅक्स – ०२२ – २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


क्र. आआसे/ कक्ष-७अ/ टे-१/ बाह्यरूग्ण विभाग/375-519/२०२१

दि. 21 .०१.२०२१

प्रति,

१. उपसंचालक आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व)
२. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय (सर्व)
३. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- बाहयरुग्ण विभाग दोन वेळेस सुरु करण्याबाबत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त संस्थांमध्ये बाह्यरूग्ण विभागाची वेळ सकाळी ८.३० ते १२.३० व सायंकाळी ४.०० ते ६.०० अशी निश्चित करण्यात आली आहे. शासकीय आरोग्य संस्थांमध्ये बाह्यरूग्ण विभाग या मार्गदर्शक सूचनांनुसार चालणे अपेक्षित आहे. तथापि माझ्या असे निदर्शनास आले आहे की ब-याच शासकीय आरोग्य संस्थामध्ये सायंकाळचा बाह्यरुग्ण विभाग चालविला जात नाही. त्यामुळे या सुविधेपासून जनता वंचित राहत आहे.

त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त सर्व शासकिय रूग्णालये/ प्राथमिक आरोग्य केंद्र/ विविध शासकिय दवाखाने, प्राथमिक आरोग्य पथके आणि आरोग्य वर्धिनी केंद्र यामधील बाहयरूग्ण विभागाच्या वेळांबाबत खालील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. उपरोक्त सर्व संस्थांच्या बाह्यरूग्ण विभागाची वेळ सकाळी ०८.३० ते १२.३० व सायंकाळी ०४.०० ते ६.०० अशी राहिल.
२. सोमवारी आणि शनिवारी सार्वजनिक सुट्टी आली तरीही बाह्यरूग्ण विभाग सुरू राहिल.
३. रूग्णालयांमध्ये दुपारी ०१.०० ते ०४.०० या कालावधीमध्ये विशेष बाह्यरूग्ण विभाग तसेच योगा क्लासेस इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत.
४. शनिवारी दुपारी ओपीडी बंद राहिल.
५. रूग्ण नोंदणी दुपारी १२:३० व सायंकाळी ०६:०० वाजता बंद होईल त्यापूर्वी ज्यांना केसपेपर देण्यात आला आहे त्या सर्व रूग्णांची तपासणी केली जाईपर्यंत बाह्यरूग्ण विभाग चालू राहिल.
६. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये एक वैद्यकिय अधिकारी असल्यास दुपारची ओपीडी बंद राहिल. वैद्यकिय अधिका-यांनी दुपारी फिरती करणे अपेक्षित आहे.
७. आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये दुपारची ओपीडी बंद राहिल. समुदाय आरोग्य अधिका-यांनी दुपारी फिरती करणे अपेक्षित आहे.

21.1.21

डॉ. रामास्वामी एन.
आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई

प्रत तातडीच्या कार्यवाहीसाठी

१. जिल्हाधिकारी...... (सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद....... (सर्व)



Scanned with CamScanner